**रस्ता सुरक्षा अभियानांर्तगत श्री दत्त कारखान्यावर आरटीओ कार्यालयाकडून वाहनधारकांसाठी प्रबोधन**

शिरोळ/प्रतिनिधी

दिनांक ११ ते १९ जानेवारी या कालावधीत शासनामार्फत रस्ता सुरक्षा सप्ताह अभियान राबविले जात आहे.या अभियानांतर्गत येथील श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., शिरोळच्या वाहन तळ परिसरात बैलगाडीवान, ट्रॅक्टर व ट्रक चालक यांना रस्त्यावर अपघात होवून नयेत यासाठी दक्षता घेणेच्यादृष्टीने प्रबोधन करण्यात आले. यामध्ये कोल्हापूर आरटीओ कार्यालयातील सहाय्यक वाहन निरीक्षक नाजनीन बागवान, सहाय्यक वाहतूक निरीक्षक बी.जी.लीबीटे, आरटीओ ऑफिसर पाटील यांचा सहभाग होता.

प्रथम कारखान्याचे मुख्य शेती अधिकारी श्रीशैल हेगाण्णा यांनी स्वागत केले. याप्रसंगी ऊस वहातूक संघटनेचे अध्यक्ष धनाजी पाटील नरदेकर, उपाध्यक्ष माधवराव पाटील, माजी अध्यक्ष श्रीकांत माने-गावडे, सदस्य हंबीरराव पाटील, धनपाल घाट तसेच केनयार्ड विभागाकडील जयसिंग जाधव, विजय मरजे, तसेच बैलगाडीवान, ट्रॅक्टर व ट्रक चालक आदि उपस्थित होते.

०००० ०००० ००००

दिनांक : १७/०१/२०१८

मा.संपादकसाहेब/व्यवस्थापकसाहेब,
दैनिक -------------------------
-------------------------------

महोदय,

वरील बातमी उद्याचे अंकात आपल्या दैनिकामध्ये फोटोसह प्रसिध्द करून सहकार्य करावे ही विनंती. फोटो आपल्या ई मेल वर पाठविला आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
श्री दत्त शेतकरी सह.सा.का.लि.,करीता

(एम. व्ही. पाटील)
कार्यकारी संचालक


रस्ता सुरक्षा अभियान -२०१८